लोकमत दि. 25/04/2025

www.lokmat.com

लोकमत

छत्रपती संभाजीनगर, शुक्रवार, दि. २५ ए

# अतिक्रमण हटाव पथकाची उत्तर नांदेडात धडक मोहीम

## चौका-चौकातील हातगाडे हटविण्याची होतेय नागरिकांकडून मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** शहरातील रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासाठी महापालिका व पोलिस प्रशासनाच्यावतीने शहरात धडक मोहीम राबविली जात आहे. जुन्या नांदेडातून 'अतिक्रमण हटाव'चा श्रीगणेशा करून वजिराबादमार्गे गुरुवारी हे पथक आयटीआय भागात दाखल झाले. दिवसभरात ११० अतिक्रमणधारकांवर कारवाई करण्यात आली असून यानंतर अतिक्रमण केल्यास संबंधिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

मागील दोन दिवसांत दक्षिण नांदेड मधील वर्दळीच्या ठिकाणची अतिक्रमणे काढल्यानंतर आज महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मुलन पथकाने आपला मोर्चा उत्तर नांदेड भागातील अतिक्रमणधारकांकडे वळविला आहे. त्याअनुषंगाने उत्तर नांदेड भागातील प्रमुख रस्त्यापैकी राज कॉर्नर-वर्कशॉप-श्रीनगर-रेस्ट हाऊस या रस्त्यावरील अतिक्रमणे काढून टाकण्याची कार्यवाही महानगरपालिका व पोलिस विभागाने संयुक्तपणे पार पाडली आहे.



### प्रमुख रस्ते, फुटपाथवर अतिक्रमण नको

महानगरपालिका हद्दीत मुख्य रस्त्यावर व्यापाऱ्यांनी व नागरिकांनी कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण न करता रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता घेण्याचे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात येत आहे. शहरातील मुख्य रस्ते अथवा इतरत्र अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा महापालिका प्रशासनाने दिला.

### नियमितपणे व्हायला हवी कारवाई

सदरील कारवाई मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. महेशकुमार डोईफोडे, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार व अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली उपआयुक्त स.अजितपालसिंघ संधु यांच्या नेतृत्वात अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग व पोलिस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई पार पाडली. या कारवाईत उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक, भाग्यनगर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक रामदास शेंडगे, अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त रावण सोनसळे, क्षेत्रिय अधिकारी रमेश चवरे, डॉ. मिर्झा फरहतुल्ला बेग, राजेश जाधव, गौतक कवडे, अग्निशमन अधिकारी के. जी. दासरे, अतिक्रमण पथक प्रमुख अनिल चौदंते यांच्यासह महापालिकेचे ५० कर्मचारी, पोलिस विभागातील ४० कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. अतिक्रमण हटाव मोहिम ही नियमित असावी, पुन्हा अतिक्रमण करणाऱ्यावर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी होत आहे.

२०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.